**ठळक बातम्या**

- गेल्या दहा वर्षांत भाजपा सरकारनं नवीन प्रारुप विकसित केलं असून त्यात वंचितांना प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- निवडणूक रोख्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून डिजीटल स्वरूपात मिळालेली माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित

- अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेल्या भाजपाच्या विचारसरणीविरुद्ध आपल्याला लढायचं असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रतिपादन

**आणि**

- पुणे आयसिस मॉड्यूल प्रकरणी पुण्यातल्या चार स्थावर मालमत्तांवर राष्ट्रीय तपास संस्थेची टाच

**<><><><><><>**

गेल्या दहा वर्षांत भाजपा सरकारनं नवीन प्रारुप विकसीत केलं असून त्यात वंचित लोकांना प्राधान्य देल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल इंडिया टुडे कॉन्क्लेवमध्ये नमो ड्रोन दीदी योजने अंतर्गत महिला स्वयं सहाय्यता गटाला एक हजार ड्रोनचं वाटप करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते.

महिलांना ट्रॅक्टर चालवता येणारच नाही, ही समाजाची मानसिकता बदलण्यासाठी ग्रामीण भागातील युवतींना कृषी ड्रोनचं वाटप केल्याचं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं. महिलांमध्ये उपजत उत्तम काम करण्याचं कसब असतं, त्यामुळेच आमच्या सरकारनं जबाबदार कामांसाठी त्यांची निवड केली आहे. त्यातून त्या आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या ही सक्षम होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

आजमितीला संपूर्ण जग अनिश्चिततेच्या गर्तेत अडकलं आहे. भारताचा विकास मात्र वेगानं होत आहे. विकासाचा हा वेग पाहता लवकरच आपला देश जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

निवडणूक रोख्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाकडून डिजीटल स्वरूपात मिळालेली माहिती आज भारत निवडणूक आयोगानं आपल्या संकेतस्थळावर अपलोड करून प्रकाशित केली. निवडणूक आयोगाच्या डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट इसीआय डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर कँडिडेट डॅश पॉलीटिकल पार्टी या पर्यायाअंतर्गत ही माहिती सर्वांना पाहता येईल. न्यायालयाच्या निर्देशानुसार राजकीय पक्षांनी ही माहिती सर्वोच्च न्यायालयात सीलबंद लिफाफ्यातून जमा केली होती.

**<><><><><><>**

अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेली भाजपची विचारसरणी आणि काँग्रेसची सर्वसमावेशक विचारसरणी असा लढा आपल्याला लढायचा असल्याच काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं. ते आज मुंबईत मणीभवन ते ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत काढलेल्या न्याय संकल्पयात्रेत बोलत होते. देशातल्या सर्वच समाजघटकांवर अन्याय होतोय, मात्र अनेकांना इतरांवरील अन्यायाची कल्पना नसल्यानं, सत्तेविरोधात आंदोलन उभं राहत नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान, आज संध्याकाळी शिवाजी पार्क इथं भारत जोडो यात्रेची समारोप सभा होत आहे.

**<><><><><><>**

भारत निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर राज्याच्या विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी बातमीदारांशी संवाद साधून निवडणुकीच्या सज्जतेविषयी माहिती दिली.

या निवडणुकीसाठी मुंबई शहर जिल्ह्याचे साडेबारा हजार अधिकारी कर्मचारी सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी संजय यादव यांनी दिली.

**सिंधुदुर्गात** मागच्या निवडणुकीत कमी मतदान झालेल्या ठिकाणी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदार जागृतीपर उपक्रमांचं नियोजन केलं असल्याचं जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी सांगितलं.

**रत्नागिरीतही** मतदानाच्या दिवशी मच्छिमार बांधव मासेमारीवरून परत यावेत, असं नियोजन केलं असल्याचं जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह म्हणाले.

**नागपूरमध्ये** या निवडणूकीत मिशन डिस्टिंगशन यशस्वी करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचं जिल्हाधिकारी डॉ. इटनकर म्हणाले.

**यवतमाळमध्ये** ४३ विशेष मतदान केंद्र, तर १२ आदर्श मतदान केंद्राचं नियोजन आहे, असं जिल्हाधिकारी डॉ. पकंज आशिया यांनी सांगितलं.

**नांदेडमध्ये** प्रशासकीय तयारी पूर्ण झाली असून, पोलीसांच्या वतीनं प्रतिबंधात्मक कारवाय केल्या जात असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली.

आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याला आपलं प्राधान्य असल्याचं सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी म्हटलं आहे.

**अमरावतीत** मतदार नोंदणीसाठी राबवलेल्या विशेष मोहीमेला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता मतदार याद्यांच्या अद्यायावतीकरणाला गती देत असल्याचं जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सांगितलं.

निवडणुकीत खोट्या माहितीला रोखण्यासाठी समाजमाध्यमावंर कठोर देखरेखीचं नियोजन केलं असल्याची माहिती लातूरचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिली आहे.

**चंद्रपूरात** शांततामय वातावरणात निवडणूका पार पाडाव्यात यासाठी सुरक्षेच्या सर्व पातळ्यांवर नियोजन केलं असल्याची माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिली.

**सोलापूर** जिल्ह्यातही सध्या २१ हजार ३१० कर्मचारी तैनात असून शहर आणि ग्रामीण मिळून ४ हजार पोलीसांची कुमक मागवणार असल्याचं जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितलं.

**जालन्यात** अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच पहिलं प्रशिक्षण पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

**बीडमध्ये** १७ मतदान केंद्र संवेदनशील असून, सुरक्षेचं चोख नियोजन केलं असल्याचं जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी सांगितलं.

**नाशिकमध्येही** प्रशासन सज्ज असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं पुणे आयसिस मॉड्यूल प्रकरणात पुण्यातल्या चार स्थावर मालमत्तांवर टाच आणली आहे. या मालमत्तांचा वापर स्फोटकं बनवणं आणि दहशतवादी कृत्यांचं प्रशिक्षण आणि नियोजनासाठी केला जात होता. NIA नं या प्रकरणात सर्व आरोपपत्रं आधीच दाखल केली आहेत.

प्रतिबंधित जागतिक दहशतवादी संघटनांचं दहशतवादी नेटवर्क नष्ट करण्यासाठी आणि भारताच्या हिताचं रक्षण करण्याच्या प्रयत्नांचा पाठपुरावा करण्यासाठी, NIA नं गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या राज्यांमध्ये आयसिसच्या

विविध मॉड्यूल्सवर कारवाई केली आहे. आयसिसच्या कटाचा आणि कारवायांचा तपास सुरू आहे.

<><><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नंदुरबारमधले विधानपरिषद आमदार आमश्या पाडवी यांनी आज शिवसेनेमध्ये प्रवेश केला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन या निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचं आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं पक्षात स्वागत केलं.

<><><><><><>

मराठा समाजाला कायमस्वरुपी टिकणारं आरक्षण ओबीसीमधून मिळावं, त्याचबरोबर सगेसोयर्यांच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी या मागणीकडे सरकारनं दुर्लक्ष केलं . त्यामुळे सरकारच्या विरोधातला उद्रेक आता लोकसभा निवडणुकीत दाखवून देणार असल्यानं धाराशिव लोकसभा मतदारसंघात सकल मराठा समाजाचे एक हजाराहून अधिक उमेदवार अर्ज दाखल करणार असल्याची माहिती आज धाराशिव येथे पत्रकार परिषदेत देण्यात आली.

<><><><><><>

NTA अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्था, १५ ते ३१ मे दरम्यान CUET-UG ही विद्यापीठ सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करणार आहे. या कालावधीत, २० आणि २५ मे या सार्वत्रिक निवडणुकांच्या दोन तारखा आणि परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी येत आहेत. २६ मार्च या अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेनंतर, CUET-UG साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांची राज्यं आणि मतदारसंघ याविषयी माहिती प्राप्त होईल. ही माहिती आणि निवडणुकीच्या तारखांनुसार, राष्ट्रीय चाचणी संस्था CUET-UG साठी १५ ते ३१ मे दरम्यान

होणाऱ्या परीक्षेचं वेळापत्रक जाहीर करील, असं विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे हळदीची लागवड घटली असूनही वाशीम जिल्ह्यात हळदीच्या भावानं आतापर्यंतचा विक्रमी टप्पा पार केला. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीत कांडी हळदीला कमाल १८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. कमी उत्पादन आणि चांगली मागणी यामुळे हळदीचे भाव वाढल्यानं हळद उत्पादकांना दिलासा मिळाला आहे. बाजारात हळदीची आवकही वाढली आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा, सोसाट्याचा वारा वाहण्याचा तसंच गार पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या काळात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकणात हवामान कोरडं राहील, अशी शक्यता हवामानशास्त्र विभागानं व्यक्त केली आहे.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना होणार आहे. नवी दिल्लीतल्या अरूण जेटली स्टेडियमवर हा सामना होईल. संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

//<><><><><>//